**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मोः ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २९४ वा | रविवार, दि. ०६ जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# संतांचे संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम निर्मल दिंडीच्या माध्यमातून- मुख्यमंत्री फडणवीस

## 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्यवारी' उपक्रमाचा समारोप



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त)ः–** सर्व संतांनी निसर्गप्रेमाचा आणि स्वच्छतेचा संदेश दिला आहे, आपल्या नद्यांवर, निसर्गावर प्रेम करायला शिकवले आहे. त्यामुळे विठुमाऊलीच्या दर्शनाला येताना त्यांचा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम निर्मल दिंडीच्या माध्यमातून वारकरी करतात, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर पंचायत समिती आवारात ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्यावतीने आयोजित श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा 'निर्मल दिंडी' तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रम आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'आरोग्यवारी' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार समाधान आवताडे, अभिजित पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कलशेट्टी, डॉ.बाबासाहेब देशमुख, देवेंद्र कोठे, विक्रम पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनाची आस लाऊन पंढरपूर येथे पोहोचतात. वारी दरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचा विचार करुन २०१८ वर्षीपासून निर्मलवारी सुरुवात केली. याअंतर्गत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली. सर्व दिंडीमधील वारकऱ्यांनी या संकल्पनेचा स्वीकार केला, त्यामुळे पालखी तळावर घाणीचे साम्राज्य दिसत नाही. महिलांची मोठ्या प्रमाणात सोय झाल्यामुळे वारीमध्ये त्यांची संख्या वाढलेली आहे. आपली वारी निर्मल, स्वच्छ झाली आहे.

ग्रामविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्मलवारी संकल्पना यशस्वीरित्या राबविली, त्याचबरोबर निर्मल दिंडीच्या माध्यमातून लोककलावंत लोकजागर करुन स्वच्छतेबाबतचा संदेश घरोघरी पोहचविण्याचे काम करीत असतात.

विठुरायाच्या दर्शनाची आस लाऊन चालणाऱ्या पावलांची सेवा करून विठुरायांच्या चरणाची सेवा केल्याचे प्रत्यंतर यावे, या सेवाभावाने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाद्वारे चरणसेवा उपक्रम राबवून वारकऱ्यांचे सेवा केली. त्यांचे आरोग्य आरोग्य व्यवस्थित ठेवण्याचे काम केले.

वारीच्या दरम्यान महिलांना येणाऱ्या मासिक पाळीसह इतर अडचणीचा विचार करता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'आरोग्यवारी' उपक्रमाच्या माध्यमातून महिला वारकऱ्यांची विशेष काळजी घेण्याचा प्रयत्न केला. याकरीता आवश्यता त्या सुविधा उपलब्ध करुन अतिशय सुंदर नियोजन केले, असे मुख्यमंत्री म्हणाले. पुणे, सातारा आणि सोलापूर प्रशासनाने वारकऱ्यांना अतिशय चांगल्या सुविधा उपलब्ध केल्याबद्दल तसेच निर्मल दिंडी, चरणसेवा, आरोग्यवारी यशस्वी केल्याबद्दल प्रशासन, सेवाभावी संस्था आदींचे त्यांनी अभिनंदन केले.

वारकऱ्यांची सेवा ही मोठी संधी असून वारीचे चांगल्या प्रकारचे नियोजन करण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाला सोबत घेऊन वारीचे अतिशय उत्तम नियोजन केले. वारकऱ्यांना जर्मन हँगरच्या माध्यमातून राहण्याची व्यवस्था, महिलांकरीता स्वच्छतागृहासह स्नानगृह, पायाचे मसाज अशा आवश्यक त्या सर्व सुविधा वारकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला, नवीन उंची गाठत एक उच्चांक निर्माण केला आहे. त्यामुळे यावर्षीच्या वारीचे वेगळेपण पहायला मिळत आहे. सेवा कधीच संपत नसते, सेवेचे नवीन उच्चांक गाठायचे असतात. याकरिता प्रयत्नपूर्वक वारकऱ्यांची सेवा केली पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले.

### वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न-ग्रामविकास मंत्री

गोरे म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वारी सर्वोत्तम व्हावी, वारकऱ्यांना त्रास होता कामा नये, (पान 2 वर..)




## संपादकीय

# सकल तीर्थाचे माहेर

वारकरी पंथात एकादशी व्रत, वारी, हरिपाठ, नामस्मरण, भजन, कीर्तन इत्यादींना जसे महत्त्व आहे तसेच चंद्रभागेला आणि चंद्रभागेतील पवित्र स्नानालाही तितकेच महत्त्व आहे. पंढरीला जाऊन, चंद्रभागा पाहून, तिचे दर्शन घेऊनच सर्व वारकरी माघारी परततात. किबहुना आधी चंद्रभागेचे स्नान आणि नंतर विठुरायाचे दर्शन असा हा क्रम असतो. संत नामदेवांनी म्हटले आहे 'आषाढी कार्तिकी भक्तगण येती हो साधुजन येती! चंद्रभागेमध्ये स्नानजे करती' म्हणजेच चंद्रभागेच्या स्नानात मुक्तीचा आनंद आहे. त्यामुळेच चंद्रभागेच्या पवित्र स्नानाला वारकरी पंथामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे हे लक्षात येते.

'सकल तीर्थाचे माहेर' म्हणून चंद्रभागेचा अनेक संतांनी उल्लेख केला. ते संतांच्या अगाध विठ्ठलभक्तीचेच प्रतीक आहे. मराठी सामान्य जनांच्या मनात इतर तीर्थक्षेत्री जाता येत नाही याबद्दल कोणतीही खंत अथवा न्यूनगंड राहू नये म्हणूनच चंद्रभागेस मराठी संतांनी भूलोकीचे वैकुंठ हा दर्जा दिला. मराठी संताच्या अभंगातून चंद्रभागा तुडुंब भरून वाहते. चंद्रभागेच्या तीरावरच भावभक्तीचा व विठ्ठलभक्तीचा मळा फुलला. 'माझी बहीण चंद्रभागा करितसे पाप भंगा' असे म्हणून संत एकनाथांनी तिला सजीव मानवी देहरुपात पाहिले. तिला बहिणीचा दर्जा देऊन समग्र संत मेळ्यामध्ये चंद्रभागेलाही सामील करून घेतले. कधी माझी माय तर कधी बहीण अशा स्त्री रुपात तिला पाहिले गेले. माझी माय चंद्रभागा! आज चांदण्यात न्हाली! असे म्हणूत संत जनाबाईने तर तिला चांदण्यात न्हाऊ घातले. हा अभंग म्हणजे उत्तम भावकाव्याचा नमुनाच. त्या दृष्टीने चंद्रभागा केवळ मोक्षदायिनी राहिली नाही तर ती इथे भावदायिनी बनली. चंद्रभागेच्या साक्षीनेच मराठी संत आपले जीवन जगले. आपले सुखदुःख चंद्रभागेच्या पाण्यातच त्यांनी वाहिले आणि आपल्या व्यथा वंचनाही तिच्यातच विसर्जित केल्या. संत नामदेवाचे वास्तव्यच चंद्रभागेच्या तीरावर असल्याने त्यांच्या अनेक अभंगातून या तीर्थाबद्दलचा आभिमान ओतप्रोत भरलेला दिसतो. संत नामदेवाच्या अंतरंगातील उत्कट विठ्ठलभक्ती आणि पंढरी प्रेमाच्या असीम भावनेमुळे ते स्वाभाविकच ठरते. पंढरीचा प्रेमा म्हणूनच नामदेवांची ओळख असल्याने त्यांनी आपल्या पंढरी माहात्म्याच्या अभंगामध्ये चंद्रभागेची थोरवी गायली आहे. संत नामदेव म्हणतात, 'सर्व सुख राशी भिवरेच्या तीरी । आमुची पंढरी कामधेनु ।' या पुढे जाऊन ते 'सकळा शिरोमणी चंद्रभागा' असा उल्लेख करून सर्व तीथार्हून अधिक महत्त्व चंद्रभागेस देतात. एवढेच नाही तर 'प्रतिदिनी माध्यान्ही। सकळ तीर्थे तिये स्थानी। भिवरे सुस्नात होऊनी । विठ्ठल चरणी लागती।' असे म्हणून ते चंद्रभागेचे महात्म्य अभिव्यक्त करतात, हे लक्षात येते. 'त्रिभुवनाची तीर्थे झाली ती मलीन । व्हावया पावन आली इथे।' फक्त भूतलावरच नव्हे तर तिन्ही लोकांमध्ये चंद्रभागा किती श्रेष्ठ आहे असा दाखला नामदेव या अभंगातून देतात. संत नामदेवांनी जे महत्त्व चंद्रभागेला दिले त्यामध्ये त्यांचे द्रष्टेपण आणि श्रेष्ठ प्रवक्त्याची अनन्यसाधारण अशी गुणसंपन्नता दिसून येते. वारकरी पंथाचा आणि विठ्ठलभक्तीचा प्रसार, प्रचार करण्यासाठी संत नामदेवांनी किती प्रयत्न केले याचे हे मूर्तिमंत प्रतीक आहे. पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान! आणिक दर्शन, विठोबाचे! हेच तमाम वारकर्‍यांच्या जीवनाचे श्रेय असल्याने मराठी संताची चंद्रभागा ही मराठी लोकमानसामध्ये भक्तिभावाने प्रवाहित झालेली दिसून येते. सामान्य मराठी जनाला इतरत्र कुठेही तीर्थाटन करता आले नाही, तरी त्यांच्या मनात कसलेही मानसिक, पारमार्थिक न्यूनगंड निर्माण होऊ नये याची पुरेपूर काळजी मराठी संतानी घेतली आणि त्यासाठी चंद्रभागेची थोरवी त्यांनी मुक्त कंठाने गायली. असे आपण सार्थपणे म्हणू शकतो. या चंद्रभागेच्या तीरीच गोमटी पंढरी वसलेली आहे याचा सार्थ अभिमान नामदेवांना होता. ऐसे तीर्थ कोणी दाखवा गोमटे! जेथे प्रत्यक्ष भेटे परब्रह्म! कोठे ऐसे क्षेत्र आहे त्रिभुवनी! सकळा शिरोमणी चंद्रभागा! या तीर्थासारखे अन्य तीर्थ नाहीच असे नामदेवांनी ठामपणे प्रतिपादन केले. सर्वांग व्यापिनी भीमा सुंदरी म्हणत त्यांनी चंद्रभागेच्या विशालतेचा, सौंदर्याचा वेध घेतला. चंद्रभागेसी करिता स्नान! तुझे दोष पळती रानोरान! असे म्हणत या नदीच्या पावित्र्याची महिमा त्यांनी गायली. वारकरी पंथात चंद्रभागेच्या स्नानास एवढे महत्त्व का? याचे उत्तर आपणास संत नामदेवादी संताच्या अभंगातूनच मिळते. संत नामदेव चंद्रभागेस आद्यत्वाचा मान देतात. जेव्हा नव्हती गोदा गंगा। तेव्हा होती चंद्रभागा। असे धाडसी विधान नामदेव करतात तेव्हा हे विधान भौगोलिक कसोटीवर तपासता येत नाही, सिद्ध करता येत नाही. नामदेवांच्या अगाध अशा पंढरी प्रेमातूनच हे आविष्कृत झाले.

चंद्रभागेच्या तीरावर कोणताही विधी केला जात नाही. मुळातच कर्मकांडाला फाटा देऊनच वारकरी पंथाने सुलभ भक्तीची शिकवण दिली. नाममाहात्म्य लोकमानसात रुजविले. त्यामुळे हा प्रयोग घडला आणि नंतर सर्वदूर पोहचला तोहि चंद्रभागेच्या साक्षीनेच. चंद्रभागेच्या तीरावर इतर तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी जे कर्मकांड केले जाते ते केले जात नाही. याचे कारण म्हणजे चंद्रभागेत नामभक्तीचे, कीर्तनरुपी श्रवणभक्तीचा पाया घातला गेला. जिथे देहभान विसरते अशा पवित्र स्थळी कोणती पापे शिल्लक रहाणार? या जाणीवेतूनच इथे घडतो तो केवळ नामघोष. महत्त्व आहे ते नामभक्तीला. तेराव्या शतकातील धार्मिक कर्मकांड आणि त्यातून होणारे सामान्य जनांचे शोषण याला पर्याय म्हणूनच वारकरी पंथाच्या रूपाने सुलभ अशा नामभक्तीचा पाया रचला गेला. त्याला अधिक प्रशस्त करण्याचे कार्य संत नामदेवांनी चंद्रभागेच्या तीरावरूनच केले.

# वारकरी छत्रपती परंपरा





गेल्या काही वर्षापासून आषाढी वारी पंढरपूर मध्ये ठरवून वादविवाद सुरू केले आहेत. हिंदू धर्मविरोधी लोक तसेच शहरी नक्षलवादी वारीत घुसले असल्याचे पसरवले जात असते. एवढेच नाही तर विधीमंडळात पोषक चर्चा घडवून आणली जाते. नि मिडिया व्यापक प्रसिद्धी देते. परिणामी सामाजिक जीवन गढूळ होते. प्रत्यक्षात विषमतावादी कार्यकर्ते वारीत घुसवलेले आहेत असे लक्षात येते. संभाजी ब्रिगेड वा तत्सम चळवळी बदनाम करण्यासाठी हे सूत्रबद्ध नियोजन आहे.

मुळातच चळवळीतील कोणीही हिंदूधर्म विरोधात नाहीत. तर हिंदू धर्म ग्रंथ मनुस्मृती आचरणात आणण्याच्या सक्ती विरोधात आहेत. भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून समता बंधुता समानता स्वातंत्र्य न्याय समाजातील सर्व घटकांमध्ये पालन केले पाहिजे अशीच एकमेव प्रार्थना व मागणी करत आहेत. हीच वारकरी भूमिका आहे. हिंदू धमार्तील कालबाह्य रुढ्या परंपरा विरोधात भक्ती शक्ती लिंगायत महानुभाव वारकरी ते शिव फुले सयाजी शाहू आंबेडकर उभे राहिले आहेत. सर्वच देशांमध्ये असे आंदोलने सुरू आहेत. तर कालबाह्य शोषणवादी परंपरांचे समर्थक विरोध करतात. वारी मध्ये सामील होऊन वारकरी समाजाचे आभार मानणे. वैचारिक देवाणघेवाण करणे. तसेच महाराष्ट्रात सुख शांती बंधुभाव एकात्मता नांदावी यासाठी विठूरायांच्या चरणी प्रार्थना करणे. हाच उद्देश आहे. सामिल झालेले सर्वच सहकारी हिंदू आहेत , वारकरी आहेत , सामाजिक समतेचे पुरस्कर्ते आहेत. हिंदू धमार्तील सर्वच क्षेत्रातील विषमता संपवावी हीच प्रार्थना श्रीविठ्ठल चरणी करण्यासाठी वारीत सामील झाले आहेत. महाराष्ट्रातील सामाजिक धार्मिक सांस्कृतिक राजकीय आर्थिक शैक्षणिक इत्यादी ठिकाणी भारतीय संविधानातील तरतुदी लागू करण्याची मागणी केली जाते. मनुस्मृतीचे समर्थन तसेच प्रचार करणे राष्ट्रविरोधी मानावे . वारकरी संत हीच मागणी करतात . अगदी प्राचीन काळी भारतीय जनता एकसंध होती. मानवतावादी , पोषणवादी, समतावादी समाज होता. मानवी उत्क्रांतीच्या प्रक्रियेत काही हजार वर्षांपूर्वी वैदिक व अवैदिक विभागणी झाली. हिंदू समाज विभागला गेला. पुढील टप्प्यात चार वर्ण व असंख्य जाती जमाती पंथ निर्माण झाले. दिवसेंदिवस यात भर पडत आहे . धर्मग्रंथानुसार सप्त बंदी लागू करण्यात आली. विभागलेला हिंदू समाज एकत्रित यावा यासाठी तीन हजार वर्षांपासून चार्वाक महावीर बुध्द ते संत नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज व सर्वच वारकरी संत, जिजाऊ शहाजी शिवाजी संभाजी फुले सयाजी शाहू आंबेडकर अण्णाभाऊ पंजाबराव भाऊराव पेरियार, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ते वर्तमानातील अनेक परिवर्तनवादी चळवळी कार्यरत आहेत. वारीतील सहभाग हा त्याचाच एक भाग आहे . हेही एक राष्ट्रीय कार्य आहे .


आम्ही सर्वच हिंदू एकच आहोत . वर्ण जाती जमाती, हलके भारी , बेटी रोटी बंदी नको. आपसातील मतभेद गटबाजी नको. याच कारणाने आम्ही अनेक वर्षे राजकीय सामाजिक धार्मिक सांस्कृतिक गुलामीत होतो / आहोत. स्वकीय वा परकीय वर्चस्व नको. हीच मागणी घेऊन भक्ती ते वारकरी परंपरा जनजागृती करत आहेत. ते हिंदू धर्म विरोधी नाहीत. तर समतावादी आहेत . छत्रपती शिवाजी महाराजांनी " हिंदवी स्वराज्याची " निर्मिती यासाठीच केली. हिंदवी म्हणजेच मूळचा सर्वसामान्य सर्व धर्मिय जातीय भारतीय. त्यांनी समुद्र बंदी नाकारली. महिलांच्या हाती शस्त्र दिले. महिला बहुजनांना शिक्षण दिले. महाराजांनी दिलेले विचार व केलेले लोककल्याणकारी कार्य पुढील समाज सुधारकांनी समाजात रुजवले , इंग्रजी परकीय राजकीय सत्ता नेस्तनाबूत केली व स्वतंत्र भारताचे संविधान लागू झाले . याच संविधानाच्या अनुसार आज एका आदिवासी भगिनीस राष्ट्रपती हे सर्वोच्च राजकीय पद दिले आहे. याच प्रमाणे सरकारने एससी एसटी ओबीसी व महिला बहुजन समाजाला धार्मिक व सामाजिक समता देणे . हे भारतीय संविधान वारकरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संकल्पनेतील सामाजिक राजकीय आर्थिक धार्मिक विधी आरोग्य शिक्षण क्षेत्रातील चित्रण आहे . हे प्रथम सर्वांनीच समजून घेणे आवश्यक आहे .

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना हिंदू धर्म ग्रंथ मनुस्मृती मधील अनेक कायदे नाकारले होते . तरीही ते हिंदूधर्म रक्षक व हिंदू धर्म अभिमानी होते. हेच मानतो . त्यांनी हिंदू धर्मात काही निवडक सुधारणा केल्या व अंमलात आणल्या होत्या . याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करत सत्ताधारी झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कायार्ची माहिती सर्वांनाच आहे. तरीही जाणिवपूर्वक काही महत्वाचे मुद्दे येथे देत आहे. कृपया अवलोकन करून समजून घेणे.

संदर्भ :छत्रपती शिवाजी महाराज. (उत्तरार्ध). उपसंहार, पान – ५६९. आवृत्ती २०१३. लेखक वा . सी. बेंद्रे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी जनविश्वास संपादन करून अवघ्या पन्नास वर्षाच्या आयुष्यात महान राजकीय सामाजिक सांस्कृतिक धार्मिक आर्थिक क्रांती केली होती. सतराव्या शतकाच्या आरंभी रुढ असलेल्या आचार धर्मात जी क्रांती केली त्यातील निवडक महत्वाच्या घटना अशा

* सर्व धर्मांना व धर्मियांना समान वागणूक. धर्मनिरपेक्षता.
* सर्वांना आपले चालू असलेले व कालांतराने लुप्त झालेले आचारधर्म आचरण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिले.
* अध्ययन अध्यापनाचा जातीयतेशी संबंध तोडला. भागवत धमार्चा पुरस्कार केला.
* नोकरी रोजगारात सर्व धर्मियांना व जातींना समानत्व दिले . मात्र कर्तव्य व निष्ठा आवश्यक केल्या.
* बाटविण्यास विरोध व बाटलेल्यांना पुन्हा धर्मात घेण्यास मान्यता दिली.
* स्त्रिया मुली वृध्द यांचे कोणत्याही परिस्थितीत पूर्ण संरक्षण.
* साधुसंतांचा आदर केला.
* गुलामांच्या खरेदी विक्रीस आळा घातला.
* स्वाऱ्यांच्या छावण्यात स्त्रियांना बरोबर आणणे पूर्णपणे बंद केले.
* खेडेगावांना बरीच स्वायत्तता व समानता होती.
* लष्कर पूर्णपणे सरकारच्या मालकीखाली आणले .
* आरमार व समुद्रावरील हालचालींच्या धंदे रोजगारातील धार्मिक समजूती दूर करून आरमार उभारुन बळकट केले .
* राज्याच्या व्यवहाराला शिस्तबद्ध वळण लावले.
* राजपदास जनतेची मान्यता घेतली.
* मुलुखांच्या लुटालुटीत निर्बंध पाळण्याची पध्दत चालू केली.
* कला शास्त्रांचा व कलाकारांचा सन्मान व उपयोग केला. उत्तेजन दिले.
* आणखीही बारीक सारीक गोष्टींमुळे सामाजिक व धार्मिक जीवनात तंटेबखेडे होण्याची कारणे दूर केली. यातूनच –" हिंदवी स्वराज्य "– उभे केले. हिंदवी स्वराज्याचा लाभ मिळाल्याने जनता राजकीय व धार्मिक पारतंत्र्यातून मुक्त झाली.

सध्या तरी आपण धार्मिक गुलामीत आहोत. पेशव्यांनी जर इंग्रजांना मदत करुन मराठ्यांचे आरमार बुडवले नसते तर परकीय इंग्रज कधीही भारताचे राजकीय सत्ताधारी झाले नसते. अत्याधुनिक जगात भारत महासत्ता होण्यासाठी आम्ही प्रत्येकाने स्वार्थ बाजूला ठेवणे हीच राष्ट्रीय गरज आहे. वारकरी छत्रपती परंपरा हेच सांगते. सर्व हिंदू एक. सर्वच भारतीय एक. याचसाठी वारी. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात आघात (वार) करणे वा नेहमीच हअफ युद्ध साठी तयार असणे, रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग, म्हणजेच वारकरी. "दया तिचे नाव, भुताचे पालन, आणिक निर्दालन कंटकांचे. "म्हणजेच वारकरी. धार्मिक व सामाजिक समता स्थापना हेच वारकरी संत कार्य आहे. यासाठीच हा आग्रह आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आम्हाला एकजीव होण्याची सुबुद्धी मिळो हीच पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना. रामकृष्ण हरी. जय जिजाऊ.



**इंजि ॲड पुरुषोत्तम खेडेकर**
संस्थापक अध्यक्ष
मराठा सेवा संघ
मो.: +९१९८२३६९३२२७

## प्रबोधन

# लोभी माणसांनी । जगा बुडविले

माझे ते माझे आणि तुझे तेही माझेच हाच जगातील सर्व धनाढ्य, सत्तांध, लोभी, हावरटांचा मूलमंत्र असतो. अशा स्वार्थांधांचं वर्तन पाहून संतश्रेष्ठ तुकोबांना भडभडून ओकायला झालं. ह्या स्वार्थवृत्तीवर चौफेर हल्ला चढवताना. तुकोबा लिहितात– लोभावरी ठेवूनि हेत। करी असत्य न्यायनीत । त्यांच्या पूर्वजा पतन। नरकी किडे होती जाण । हावरट लोक जगाचा नरक करतात, हे तुकोबांना दिसत होतं म्हणून त्यांनी सोनेनाणे आम्हा मृत्तिकेसमान असा स्वतःचा आदर्श घोषित करून स्वार्थाच्या दरीत पडणाऱ्यांना वाचवण्याचा शिकस्तीने प्रयत्न केला. थोर विचारवंत थॉमस विल्सनही त्यासाठीच म्हणतात, The fewer desire, the more peace. अर्थात 'समाधान हवं तर लोभ सोडून द्या!'

पण लोभ सोडणं सामान्यांपासून असामान्यांपर्यंत कोणालाही जमत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. रावापासून रंकापर्यंत सारेजण लोभी असतातच! लिओ टॉलस्टॉय यांच्या कथेतील एका गरिबाचा जीव त्याच्यातील लोभाने घेतला. गरिबाचा लोभ हा त्याच्या दारिद्यार्तून आलेला असतो, पण ज्यांना पैसा कोठे ठेवावा, अशी चिंता लागते त्यांनीही लोभी असावं, ह्याला काय म्हणावं? माणसाच्या मूलभूत प्रवृत्तींपैकीच लोभ ही एक वृत्ती आहे. त्यामुळे ती नाहीशी करणं शक्य नाही. पण तिला लगाम जरूर घातला पाहिजे.

प्रत्येक बाबतीत फायदा पाहणाऱ्यांना दरिद्री मनोवृत्तीचे लोक असं म्हणणंच योग्य आहे. काही लोक काहीही सांगितलं की, याचा काय फायदा! त्याचा काय फायदा! असे उद्गार हमखास काढतात. त्यामुळे त्यांच्या मनाचा कोवळेपणा झडून जातो. त्यांचं मन वठलेल्या झाडासारखे रूक्ष आणि कठोर होतं. समाजातील परोपकारी माणसं आणि परोपकारी संस्था यांचा मोठेपणा अशा रूक्ष मनाच्या माणसांना कधीही कळणं शक्य नाही.

काही उदार, निलोर्भी लोकांनी काढलेल्या समाजसेवी संस्था, विश्वस्त निधी, सेवा संस्था यामुळे किती उपेक्षित जीव जगले, वाचले, वाढले, ते फायद्यासाठीच जगणाऱ्यांना कळूनही वळणार नाही. महात्मा जोतिराव फुलेंनी आपला पाण्याचा हौद दलित–पतितांसाठी खुला केला. वाकडं पाऊल पडलेल्या ब्राह्मण विधवांनी बालहत्या– आत्महत्या करू नये म्हणून आश्रम काढला. शिक्षणानेच स्त्री समर्थ होते म्हणून मुलींसाठी शाळा सुरू केल्या. महाराष्ट्र आज भारतात प्रगतिशील राज्य म्हणून ओळखलं जातं, ते जोतिरावांच्या शुद्ध मानवतावादी कार्यामुळेच! आज त्यांच्यासारखे निलोर्भी, परोपकारी लोक कोठे आहेत? काही श्रीमंतांचे विश्वस्त निधी आहेत, पण ते गरिबांच्या मुंड्या मुरगळून पैसा कमावतात आणि विश्वस्त निधी स्थापन करतात. काही श्रीमंत सकाळी मोफत खिचडी वाटतात. गरिबांना भिकेची अशी सवय लावणं हे काही राष्ट्रकार्य नव्हे.

त्यातूनही एक बुद्धीला अगम्य बाब म्हणजे, प्रत्यक्ष देव–देवतांचा लोभीपणा! देशातील कोणाही उद्योगपतीपेक्षा इथले देव श्रीमंत आहेत. पूर्वी तिरुपती बालाजीला 'नवकोट नारायण' म्हणत. आता तो 'नव्याण्णव हजार कोटींचा नारायण' झाला असेल! फाटक्या कफनीत वावरलेल्या साईबाबांचं संस्थान आज हजारो कोटींच्या संपत्तीचे मालक आहेत. टाटा–बिर्ला यांनी पिढ्यान् पिढ्या संपत्ती संवर्धनात खर्ची तरी घातल्या. पण दगड–धातूंच्या देवलोकांनी कोठे कष्ट केले? त्यांना कशाला हवा द्रव्यलोभ ? स्वामी विवेकानंद म्हणतात, 'ईश्वर व सैतान यांच्यात निःस्वार्थीपणा व स्वार्थीपणाचाच काय तो फरक आहे!' या विचारांच्यानुसार आपली गडगंज मंदिरं आणि तुंबडीभरू मठसंस्कृती ही सैतानी आहेत, खरं ठरतं. देशाचं दारिद्र्य वाढवण्यात त्यांना सिंहाचा वाटा द्यावा लागेल! म्हणून–

माणसात लोभ । असतो हे कळे
जग कडू फळे । त्याची खाई ॥ १
देवांमध्ये लोभ । दिसे दुर्दैवाने
समजून हे घेणे शक्य नाही ॥ २
हिऱ्याचे मुकुट । देवाच्या डोकीस
भक्तांच्या वस्त्रास सतरा गाठी ।। ३
लोभी माणसांनी । जगा बुडविले
हाल अति झाले । गरिबांचे ॥४
देवांच्या लोभाने। देश बुडविला
नरकात नेला । जनलोक ॥५
लोभी माणसांनी । गरिबा गांजले
रक्त शोषियले । अशक्तांचे ॥ ६
मठ–मंदिरांनी । गिळले भक्तांना
पत्ताही लागेना । कोठे गेले ॥७
मठ–मंदिरांची। लोभी धनिकांची
सत्ता अन्यायाची । करा दूर ॥८
जनलोकांमध्ये । त्यांचे धन वाटा
उजळाया वाटा । नव्या जगी ॥ ९
आर्थिक समता । हाच स्वर्ग जगी
त्याविण वाऊगी। सारी भाषा ।। १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# पुनरचीत हवामान आधारित फळपिक विमा योजनेस 6 जुलै पर्यंत मुदत वाढ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** प्रधानमंत्री पिक पिमा योजने अंतर्गत पुनरचीत हवामान आधारित फळपिक विमा योजना अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकार कडून फळ पिक विमा भरण्यास मुदत वाढ देण्यात येत आहे. मार्गदर्शक सूचना नुसार पेरू, मोसंबी व लिंबू पिकाचा फळपिक विमा भरण्याची अंतिम मुदत 14 जून 2025 पर्यंत होती.

परंतु ऑनलाईन पोर्टल वरील काही तांत्रिक अडचणीमुळे सोलापूर जिल्ह्यातून बरेच शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिलेले आहेत. सदर सर्व पेरू, मोसंबी व लिंबू फळबाग धारक शेतकर्यांना कळविण्यात येते कि पेरू मोसंबी व लिंबू पिकाचा फळपिक विमा भरण्याची अंतिम मुदत 30 जून 2025 पर्यंत वाढविण्यात आलेली होती त्यास पुन्हा मुदत वाढ होऊन दिनांक 06 जुलै 2025 वाढविण्यात आलेली आहे.

पिक– पेरू– पिकाचे उत्पादनक्षम वय (वर्ष) 3– विमा भरणा मुदत–14 जून 2025 – सुधारित विमा भरणा मुदत–06 जुलै 2025– शेतकरी विमा हफ्ता (प्रति हेक्टरी)–3500 – विमा सरक्षित रक्कम –70000

मोसंबी– पिकाचे उत्पादनक्षम वय (वर्ष) 3– विमा भरणा मुदत–14 जून 2025 – सुधारित विमा भरणा मुदत–06 जुलै 2025– शेतकरी विमा हफ्ता (प्रति हेक्टरी)–5000 – विमा सरक्षित रक्कम – 100000

लिंबू– पिकाचे उत्पादनक्षम वय (वर्ष) 4 – विमा भरणा मुदत–14 जून 2025 – सुधारित विमा भरणा मुदत–06 जुलै 2025– शेतकरी विमा हफ्ता (प्रति हेक्टरी)–4000 – विमा सरक्षित रक्कम – 80000

तरी सोलापूर सोलापूर जिल्हातील सर्व डाळिंब, पेरू, लिंबू, चिकू, सीताफळ व मोसंबी बाग धारक शेतकऱ्यांनी आपल्या फळ बागेचा विमा नजीकच्या कॉमन सर्विस सेंटर, बैंक किवा आपले सरकार केंद्रास भेट देवून आपली फळबाग विमा संरक्षित करून घ्यावी. असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे

## विठ्ठल रखुमाई

७५० वर्षानंतर ही आज
'सुर्य' आणि 'चंद्र' माझ्या
ज्ञानदेवाला वंदन करतोय...
ज्ञानराजा तुझ्या पाठीमागे मुका
जीव तो रेडा ही वेद म्हणतोय...
"निवृती"मी पणाची व्हावी
यासाठी ज्ञान घ्यावे ॥
"ज्ञानाची" प्रचिती येऊन ही
सोपे मार्ग निवडावे ॥
"सोपान" शिकतो या जीवन
मार्गातून सहज सोपे व्हावे॥
"मुक्ताई" ने आत्म्यावर ही
अधिराज्य करून मुक्त व्हावे॥
मिरच्यांचा व्यापार असून
जिथे विठू च्या
नामस्मरणांचा व्यवहार केला,
तो "तुकाराम" वैकुंठासी गेला ॥
गाढवाला 'काशीचे' अमृत
पाजले, ते "संत एकनाथ"
देवापेक्षाही श्रेष्ठ झाले"
"माझ्या विठ्ठलांनी "
"नामदेवाची" खीर चाखावी ॥
"चोखोबांची" गुरे राखावी ॥
"सावत्या" बरोबर
शेती कसावी ॥
जणाबाई सोबत
जात्यावर औवी गावावी ॥
मीराबाईच्या अंगावर
थंडीमध्ये गोधडी पांघरावी ॥
सावळ्या आज तुला
भेटण्यासाठी तुझी
लेकरे आली पंढरीला ॥
पंचप्राण तल्लीन होऊन
डोळाभरूनी आज पाहती
"रखूमाई विठ्ठलाला"... !

**मयुरी विश्वनाथ बाबर**
9112443343

पान १ वरून

# संतांचे संदेश प्रत्यक्षात ...

याकरिता त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. आषाढी वारी यशस्वी करण्यासाठी प्रशासनासोबत विविध सेवाभावी संस्था, विश्वस्त आदी घटकांनी अहोरात्र कामे करत मनोभावी सेवा करीत आहे. वारकऱ्यांकरिता पालखीतळावर सुविधा देण्याच्यादृष्टीने जर्मन हँगरसह, वैद्यकीय सुविधा, महिलांकरिता शौचालय, स्वच्छतागृहे, मसाज मशीन आदी सर्वोत्तम सुविधा वारकऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला. वारी दरम्यान प्रशासनाच्यावतीने केलेल्या व्यवस्थेबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे गोरे म्हणाले. श्रीमती चाकणकर म्हणाल्या, देहू, आळंदी, मुक्ताईनगर, त्र्यंबकेश्वर यांसह विविध भागातून महिला वारकरी वारीत सहभागी होतात. अशा या सहभागी महिलांच्या मासिक पाळी आदी आरोग्य आणि स्वच्छताविषयक बाबींचा विचार करुन महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ४ वर्षापासून 'आरोग्य वारी' प्रशासनाच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाअंतर्गत महिलांकरिता हिरकणी कक्ष, ३७५ ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वितरण, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या, असे श्रीमती चाकणकर म्हणाल्या.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले, जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या चरण सेवेचे महत्त्व लक्षात घेता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून पालखी सोहळ्यात कक्षाच्यावतीने प्रथमच 'चरणसेवा' उपक्रम राबविण्यात आला. २ कोटी ७५ हजार वारकऱ्यांची चरणसेवा करण्यात आली. लोकसहभातून एकूण २ कोटी रुपयाहून अधिक निधी उपलब्ध झाला.

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या ९ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सेवा केली, चरणसेवा सेवा उपक्रमाबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे श्री. नाईक म्हणाले.

जंगम म्हणाले, 'निर्मल दिंडी' उपक्रमाअंतर्गत सुमारे ११ हजार शौचालय, १५५ हिरकणी कक्ष, स्तनदा माताकरिता हिरकणी कक्ष, सॅनिटरी नॅपकिन, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन, लहान बालकांकरिता खेळणी वस्तू आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. स्वच्छतेच्या कामाकरिता सुमारे १ हजार २३६ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे, असेही जगंम म्हणाले.

यावेळी फडणवीस यांच्या हस्ते स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले, तसेच निर्मल दिंडी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या वतीने पालखी सोहळ्यात राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता काम केलेल्या अधिकारी, सेवाभावी संस्था, कार्यकत्यार्चा तसेच आरोग्यवारी उपक्रमात उल्लेखनीय काम केलेल्या संस्थांचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पंढरपूरचे उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, विकास अधिकारी सुशील संसारे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्यवारी' उपक्रमाबाबत माहितीपट दाखविण्यात आले.

# जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी जून 2025 अखेरचे त्रैमासिक विवरणपत्र 31 जुलै पर्यंत ऑनलाईन सादर करावे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जिल्ह्यातील सर्व कार्यालयांना सुचित करण्यात येते की, सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसूचीत करणेची सक्ती करणारा) कायदा 1959 व त्याखालील नियमावली 1960 मधील कलम 5(1) (शासकीय आस्थापनांसाठी), 5 (2) (खाजगी आस्थापनांसाठी) नुसार, सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांचेकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती पुरुष/स्त्री/एकूण (त्रैमासिक विवरणपत्र ई.आर–1) स्थानिक सेवायोजन कार्यालयास ऑनलाईन सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे.या सेवायोजन क्षेत्र माहितीचा उपयोग हा योजनाबध्द आर्थिक विकासात निरनिराळे प्रकल्प तयार करण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक मनुष्यबळाचा अंदाज घेण्यासाठी होत असतो. अशा प्रकारची प्राप्त होणारी सांख्यिकी माहिती महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कडे दर तिमाहीस पाठविली जाते.

तरी सदर त्रैमासिक विवरणपत्र (ई. आर–1) 31 जुलै 2025 पर्यंत ऑनलाईन https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. या वेबपोर्टलवर त्रैमासिक विवरणपत्र ई. आर–१ हे प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ऑनलाईन सादर करण्यासाठी प्रत्येक आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड हे यापूर्वीच दिलेले आहेत त्याचा वापर करून भरण्यात यावा. यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्कचौक, सोलापुर (0217–2992956) या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.त्रैमासिक विवरणपत्र (ईआर–1) ऑनलाईन भरण्याची पध्दत खालीलप्रमाणेः–सर्व प्रथम आपल्या संगणकाच्या बाऊजरमाणे https://rojgar.mahaswayam.gov.inसंकेतस्थळ ओपन करावे. या संकेतस्थळावर नियोक्ता (नोकरी सूची) एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) हा पर्याय निवडावा. स्क्रिनवर दिसणा–या नियोक्ता लॉग–इन (एम्प्लॉयर लॉगीन) या विओमध्ये आस्थापनेच्या युजरआयडी/रजिस्ट्रेशन आयडी व पासवर्ड यांचा वापर करुन लॉग इन करावे, यशस्वीरित्या लॉग–इन झाल्यानंतर स्क्रिनवर डाव्या बाजूस उपलब्ध असणा–या मेन्यू मधील ईआर–1 या पर्यायावर क्लिक करावे, सदनंतर स्क्रिन वर दिसणा–या एन्टर या बटणावर क्लिक करुन आपल्या आस्थापनेची मनुष्यबळाबाबतची माहिती अद्यायावत करावी.

माहिती भरुन (Submit) झाल्यानंतर जनरेट रिसीट या बटणावर क्लिक करून आऊनलोड करुन घ्यावे व आपल्या माहितीस्तव ईआर–1 भरल्याबाबतची रिसीट जतन करुन ठेवावी.यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्कचौक, सोलापुर (0217–2992956) या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास ,रोजगार व उद्योजकता सोलापूर यांनी केले आहे .

## वात्रटिका

### जय महाराष्ट्र आणि..

मर्जी सांभाळावी
हे नेतेच शिकवतात...
खूष करण्यासाठी
किती किती वाकतात...
कोणाच्या घरात
कोणाची वरात
जय हिंद,जय महाराष्ट्र
आणि जय गुजरात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गिरीश महाजन यांचा आदिवासी पारधी समाजाच्या वतीने सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** आदिवासी पारधी समाज सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजातील प्रमुख पदाधिकारी यांच्यावतीने जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचा सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात सत्कार करण्यात आला.



त्याचे प्रमुख कारण की आदिवासी समाजासाठी आयोग स्थापने साठी मोलाचे योगदान मंत्री गिरीश महाजन केले असून सदर समिती मध्ये ते सदस्य असून भविष्यात आदिवासी पारधी समाजांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोलाचे प्रयत्न करणार आहेत.

सदर आदिवासी पारधी समाज आयोग लवकरच स्थापन होऊन आदिवासी पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार यांना नोकरीची संधी मिळणार असून तसेच आर्थिक बाजू सक्षम होणार अशी ग्वाही मंत्री महोदय यांनी दिलेली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील व धाराशिव जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी यांनी मंत्री महोदय यांचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला.

त्याप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे पूर्व अध्यक्ष शशिकांत चव्हाण, भाजपा शहराध्यक्ष रोहनीताई तडवळकर, थोर समाजसेवक पंडित भोसले, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरसेविका सौ राजश्री चव्हाण, भाजपा अनुसूचित जमाती प्रदेश सचिव नकुल चव्हाण, आदिवासी पारधी विकास परिषद सोलापूर जिल्हा अध्यक्ष विजयकुमार काळे, सचिन शिंदे सर पंढरपूर, समाजसेवक कुंदन भोसले, सिद्धेश्वर शिंदे, देवाप्पा शिंदे, शांताबाई शिंदे,पत्रकार पिंटू पवार, भाजपचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण आदी उपस्थित होते.

# संताच्या पालखी मार्गावर ११ हजार शौचालये भाविकांच्या सेवेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्यात विविध दहा संताच्या पालखी मार्गावर भाविकांसाठी ११ हजार फिरती शौचालये उभारण्यात आलेली आहेत. अशा माहिती जिल्हा परिषेदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

ग्रामविकास विभागाच्या निर्मल वारी उपक्रमामुळे भाविक खुश दिसून येत आहेत. पाणी व स्वच्छता विभागामार्फत आषाढी वारी पालखी सोहळ्यामध्ये 10 मानाच्या पालख्या करिता 60 ठिकाणी 11987 तात्पुरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

10 शौचालयापाठीमागे (200 लिटरचे) एक ड्रम याप्रमाणे 11987 शौचालयासाठी 1250 ड्रम निश्चित करण्यात आलेले आहे. मैलगाळ व्यवस्थापनासाठी 57 सक्शन मशीन, 57 जेटींग मशीन तयार ठेवण्यात आले आहे. विभागामार्फत 1500 स्वच्छता व साफसफाई स्वंयसेवक नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच तात्पुरते शोचालय व्यवस्थापनासाठी पुरवठादारामार्फत एकावेळी 283 कर्मचारी, 42 पर्यवेक्षीय कर्मचारी नेमले जात आहेत. सदर वारीकरिता जिल्हास्तरावरुन 6 अधिकारी वर्ग, 31 जिल्हास्तरीय कर्मचारी व 86 विस्तार अधिकारी व ग्रामसेवक असे एकूण 123 अधिकारी व कर्मचारी नेमले जातात.



**आज गतवर्षी पेक्षा चार पट शौचालय सुविधा**

गतवर्षी पेक्षा चार पट शौचालय सुविधा देणेत आलेली असल्याचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी सांगितले. नाशिक, पुणे, जळगाव, या ठिकाणाहून पालखी सोहळ्या समवेत शौचालय सुविधा देणेत आली असल्याचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी सांगितले.

आषाढी यात्रा अंतर्गत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्ग या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या ठिकाणी 11889 शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे या ठिकाणी पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय व्यवस्था महिलांसाठी स्वतंत्र व्यवसाय व्यवस्था करण्यात आलेली आहे.

शौचालयाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. हात धुण्यासाठी साबणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाची उभारणी करण्यात आलेले त्याच ठिकाणी शौचालयाची देखील उपस्थित करण्यात आलेली आहे. सिईओ कुलदीप जंगम यांनी आज वाखरी, भंडीशेगाव , पिराची कुरोली येथील पालखी सोहळ्याचे ठिकाणी शौचालय व स्नानगृह व्यवस्थेची पाहणी केली.

तर वाखरी येथे ग्रामविकास मंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी दादासाहेब कांबळे, विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी पाहणी केली.

ग्रामविकास विभागाच्या निर्मल वारी उपक्रमामुळे भाविक खुश पालखी मार्गावर भाविकांसाठी मुबलक शोचालय सुविधा केल्यामुळे वारकरी यांचे मधून समाधान व्यक्त केले जात आहे. पुरेसा पाणी व्यवस्था, शौचाहून आलेनंतर साबणाने स्वच्छ हात धुणेची व्यवस्था करणेत आली आहे. रात्रीचे वेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था करणेत आली आहे. पालखी तळाचे बाजूस व्यवस्था केले मुळे वारकरी यांची सोय झाली आहे. पालखी सोहळा किमान तीन किलो मिटर च्या आंतरात मुक्कामास असतो. त्या दृष्ट्रीने सात ठिकाणी व्यवस्था करणेत आलेली आहे. तसेच भाविकाच्या व पालखी सोहळा प्रमुखाचे मागणी नुसार सुविधा करणेत येते.

# शिक्षण प्रसारक मंडळाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला – जयसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** शिक्षण प्रसारक मंडळाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात जाऊ द्यावे. आपली मते त्यांच्यावर लादू नयेत असे अवाहन संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांनी केले.



स्मृतिभवन शंकरनगर येथे शिक्षण प्रसारक मंडळातील इयत्ता १०वी मध्ये ९० टक्के पेक्षा अधिक व १२वी मध्ये ८० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या एकूण १४६ तर जेई नीट सीईटी मधील ५ अशा एकूण १५१ गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार आयोजित केला होता. या वेळी ते बोलत होते.

सदरचे सत्कार संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सौ ॠतुजादेवी मोहिते पाटील, युवानेते सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, संचालक सुभाष दळवी, निशा गिरमे नारायण फुले, रामचंद्र गायकवाड बाळासाहेब सणस, पांडुरंग एकतपुरे, वसंत जाधव, उत्कर्ष शेटे प्रमुख उपस्थित होते.

जयसिंह मोहिते पाटील म्हणाले, शिक्षण प्रसारक मंडळांने १९८४ पासून संयुक्त परीक्षा पद्धत सुरू केली. या मुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली. सध्या स्पधेर्चे युग आहे. विद्यार्थ्यांनी यशामुळे हुरळून जाऊ नये. गुणवत्तेमध्ये सातत्य ठेवावे.

संस्थेने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते बरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक गुणांचाही विकास करत सर्वांगीण विकास साधला आहे.

टीव्ही, मोबाईलच्या जमान्यात महाराष्ट्राची ग्रामीण संस्कृती, खेळ, कला लोप पावत चालली असून ती जोपासण्याचे काम अकलूज मध्ये होत आहे. महिलासाठी नागपंचमीचा सोहळा शिवपार्वती मंदिरात साजरा होणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रस्ताविकात युवा नेते सयाजीराजे मोहिते–पाटील म्हणाले, १९४८ साली सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आज संस्थेच्या ५५ शाखेतून २६ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांनी बौद्धिकते बरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रमात सहभाग घ्यावा. संस्थेने खेळासाठी सुमारे एक लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर घडवावे असेही त्यांनी सांगितले. शासनाने मुख्यमंत्री आदर्शशाळा स्पर्धेत संस्थेच्या सदाशिवराव माने विद्यालयाला जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांकासह रोख ११ लाख रुपये तर महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेस द्वितीय क्रमांकासह रोख ५ लाख रुपये देऊन गौरव केला आहे.

इयत्ता १०वी व १२वी मध्ये संस्थेत प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. यामध्ये इयत्ता १०वी परीक्षेत कु. पौर्णिमा भांगे तिने९८.२० टक्के गुण मिळवत संस्थेत प्रथम, सिफा तांबोळी ९७ टक्के व ओंकार राऊत ९७ टक्के मिळवित विभागून द्वितीय,आर्या कुलकर्णी, इंद्रनील चव्हाण, गौरांग जामदार या तिघांनी ९६.८० टक्के मिळतील विभागून तृतीय यांचा समावेश आहे.

तर १२ वीत वरद कोतमिरे याने ८९.८३ टक्के मिळवित संस्थेत प्रथम, कु. मनाली भुजबळ हिने ८९.५० टक्के मिळवित द्वितीय व कु. क्रांती पांढरे हिने ८९ टक्के मिळवित तृतीय यांचा समावेश आहे.

प्रारंभी सहकार महर्षी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील तसेच सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. सारे जहाँ से अच्छा या देशभक्तीपर गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी व आर. आर. पाटील यांनी केले.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली पत्राशेड व दर्शन रांगेची पाहणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** आषाढी यात्रा सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होत आहे. आषाढी यात्रा सोहळा कालावधीत राज्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. श्री.विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून, दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत गेली आहे. पददर्शन रांगेत तसेच पत्राशेड येथे भाविकांसाठी मंदीर समिती व प्रशासन वतीने आवश्यक मुबलक सोयी सुविधा उपलब्ध केल्या असून, या उपलब्ध सोयी सुविधांची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली. पददर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, तसेच पद दर्शन रांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीकडून करण्यात आलेल्या उपायोजनांची माहिती घेतली. तसेच या ठिकाणी भाविकांसाठी उपलब्ध केलेली शौचालये, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधांची पाहणी केली. तसेच पददर्शन रांगेतील भाविकांशी संवाद साधून मंदीर समितीकडून पत्राशेड, दर्शनरांगेत उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी दर्शनरांगेतील भाविकांना मोफत अन्नदान सुरु केले असुन या अन्नदानाचे वाटपही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. वारकरी भाविकांसाठी मंदीर समिती व प्रशासनाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची कमतरता भासणार याची घ्यावी अशा सूचनही पालकमंत्री यांनी यावेळी दिल्या. त्याचबरोबर पाहणी करताना वारकरी व भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पालकमंत्री ट्वीलरवरुन दर्शनरांगेची गोपाळपूर पर्यंत पाहणी केली.यावेळी मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर प्रशासनाकडून पत्राशेड, दर्शनरांग, दर्शनमंडप, मंदीरात भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांबाबतची माहिती दिली. तसेच दर्शनरांगेतील भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.



यावेळी त्यांच्या समवेत पाहणी करताना कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, सांगोला तहसिलदार संतोष कणसे उपस्थित होते.

# रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थी, आदर्श माता यांचा सत्कार

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशाला नातेपुते मध्ये स्वर्गीय श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील स्मृतीप्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थी व आदर्श माता यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला.कार्यक्रमासाठी स्थानिक प्रशाला समितीचे सभापती रामचंद्र गायकवाड, सदस्य बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा मिनलताई कुलकर्णी, मा. सरपंच ग्रामपंचायत नातेपुते सुरेखाताई उराडे ,प्रशालेचे मुख्याध्यापक विजय उबाळे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच इयत्ता दहावी मध्ये गुणवंत आलेले विद्यार्थी प्रणव संजय दुधाळ, यश प्रमोद दराडे, स्नेहल भाऊ वनवे इयत्ता बारावी (कला शाखा) मधील प्रशालेच्या गुणवंत विद्यार्थिनी अनुराधा अजिनाथ कर्चे, ऐश्वर्या रामचंद्र रानगट, रिद्धी हरिदास कर्चे तसेच आदर्श माता यांना रत्नाई पुरस्कार देऊन वरील मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊ वनवे यांनी केले. अनुमोदन व आभार जितेंद्र शिंदे यांनी मानले.



# दर्शनरांगेतील भाविकांसाठी गोपाळपूर येथे दोन जर्मन हॅंगरची उपलब्धता: जिल्हाधिकारी आशीर्वाद

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** आषाढी यात्रा सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होत आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा तसेच अन्य पालखी सोहळ्यांचे पंढरपूर तालुक्यात आगमन झाले आहे. श्री.विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून, दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत गेली आहे. पद दर्शनासाठी आलेल्या भाविकांना दर्शनरांगेत येण्यासाठी फार लांब जाता येऊ नये. यासाठी गोपाळपूर हद्दीत मंदिर समितीकडून सर्व सुविधायुक्त दोन जर्मन हँगरची उपलब्धता केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पद दर्शन रांगेतील भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे तसेच पददर्शन रांगेसाठी जास्त लांब चालत जाता येऊ नये यासाठी गोपाळपूर येथे जर्मन हँगर उभा करण्यासाठी खाजगी मालकीचे अडीच एकर घेण्यात आले असून, या ठिकाणी जर्मन हँगर उभा करण्याचे काम सुरू आहे. पददर्शन रांग या ठिकाणाहून सुरू केल्यास जवळपास तीन किलो मीटर पर्यंतचे दर्शन रांग यामध्ये राहील तसेच आसरा हॉटेल जवळपास एक जर्मन हँगर तयार झाला असून दोन किलोमीटर पर्यंतची दर्शन रांग यामध्ये राहील.

पददर्शन रांगेतील भाविकांसाठी दोन जर्मन हँगरची उपलब्धता केल्याने भाविकांना पददर्शन रांगेत जाण्यासाठी पाच कि.मी.चे अंतर कमी होणार आहे. या ठिकाणी भाविकांना सुरक्षा स्वच्छ पिण्याचे पाणी सुलभ शौचालय आदी आवश्यक सुविधा मंदिर समितीकडून उपलब्ध करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

तसेच गोपाळपूर –रांझणी रोड वरील दर्शन रांगेत लाईट नसल्याने, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिनांक 3 जुलै रोजी रात्री 12.30 वाजता भेट देऊन संबंधित यंत्रणेना सूचना दिल्या व त्या ठिकाणी तात्काळ प्रकल्प प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षा रक्षकांची नेमणूक देखील करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**–: संपर्क :–**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# अकलूज येथे 7 जुलै रोजी हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा कीर्तन सोहळा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** लोकनेते कै.प्रतापसिंह शंकरराव मोहिते–पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त, महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने, समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या भव्य हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कीर्तन सोहळा विजय चौक अकलूज येथे सोमवार दिनांक ७/७/२०२५ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १०.० वाजेदरम्यान होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी दिली.

मागील ९ वर्षापासून महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे हरीकिर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो आहे. याचबरोबर जनसेवा संघटना व सोलापूर जिल्हा तालीम संघाचे वतीने महाराष्ट्र केसरी पै.वेताळ शेळके यांचा एक लाख रुपयांची देणगी व सन्मानचिन्ह तसेच त्यांच्या आई वडिलांचा संपूर्ण कपड्यांचा आहेर देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

त्याच बरोबर शाहीर राजेंद्र कांबळे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार मिळाले बद्दल सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात येणार आहे.

ह.भ.प.अशोक शिंदे महाराज गुरसाळेकर यांचा सोनी TV मराठी वरील आयोजित केलेल्या "कोण होणार महाराष्ट्राचा लाडका किर्तनकार" स्पर्धेत उप विजेते झालेबद्दल सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात येणार आहे. यासह विविध संस्थेच्या वतीने लोकनेते कै.प्रतापसिंह मोहिते –पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त अनेक समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित केले आहेत. तरी सर्व नागरीकांनी वेळेवर उपस्थित राहुन या हरिकीर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ .धवलसिंह मोहिते–पाटील यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ■ |
| ८ | | ■ | | ■ | ९ | १० | | | ■ | ११ | १२ |
| १३ | | १४ | ■ | १५ | | | | ■ | १६ | | |
| | ■ | १७ | | | ■ | ■ | ■ | १८ | | | ■ |
| १९ | २० | | ■ | २१ | २२ | २३ | ■ | ■ | २४ | | ■ |
| २५ | | ■ | २६ | | | | ■ | २७ | | ■ | २८ |
| ■ | २९ | ३० | | ■ | ■ | ३१ | ३२ | | | ■ | |
| ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | ३५ | | ■ | ३६ | |
| ३७ | | | ■ | ■ | | ■ | ३८ | | ■ | ३९ | |
| | ■ | ■ | ४० | ४१ | | ४२ | ■ | ■ | ४३ | | ■ |
| ४४ | ४५ | ■ | ४६ | | ■ | ४७ | ४८ | | | ■ | ४९ |
| ५० | | | | ■ | ■ | ५१ | | ■ | ५२ | | |

**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरूंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्टू (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरूवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे-**दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गाच्या विरूध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु – 294

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

# शेतीची उत्पादकता वाढविण्यावर शासनाचा भर- मुख्यमंत्री फडणवीस

## पंढरपूर येथे 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्याला शेती फायद्याची व्हावी यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढावी असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आगामी काळात शेतीच्या सर्व फिडरचे सौरऊर्जिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या योजनेत महाराष्ट्रात सोलापूर जिल्हा प्रथम असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार विजय देशमुख, आमदार रणजीत मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय कृषी सह संचालक दत्तात्रय गावसाने आदी उपस्थित होते.

उत्पादन खर्च कमी होणे आणि उत्पादकता वाढावी यासाठी राज्य शासन अनेक योजना राबवित आहे , असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत गाव हा घटक धरून जलसंधारण, जलनियोजन पासून शेतीच्या यांत्रिकीकरणापासून बाजारसाखळी तयार करण्यापर्यंत पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन अशा सर्व बाबी गावात पूर्ण करून गावातला छोट्यातला छोट्या शेतकऱ्याला सर्व शासकीय योजनांचा लाभ होईल असा प्रयत्न करण्यात आला आहे. नुकतेच पिक विमा योजना सुधारित केली आहे.

फडणवीस पुढे म्हणाले, शेतीच्या क्षेत्रात यावर्षीपासून येत्या ५ वर्षात दरवर्षी ५ हजार अशी २५ हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, पंप आदी देण्यात येणार असून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. गतकाळात निर्णय घेतल्याप्रमाणे साडेसात अश्वशक्ती पर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल आकारले जात नाही.

पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी, शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आणि योजनांची लहान व मोठ्यातल्या मोठ्या शेतकरी अशा सर्वांना त्यांचा लाभ घेण्याची माहिती मिळावी यासाठी कृषी प्रदर्शन भरवावे अशी अपेक्षा सुधाकरपंत परिचारक यांनी २०१५ साली व्यक्त केली होती. तेव्हापासून दरवर्षी हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यामध्ये शासनाचे विविध विभाग, कृषी विद्यापीठे यांचे स्टॉल, विविध योजना, वेगवेगळ्या व्यावसायिकांनी आणि शेतकऱ्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचाही या प्रदर्शनात समावेश आहे. एकात्मिक कीड नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'चा वापर, उत्पादकता वाढविण्यासाठीच्या वेगवेगळी पद्धतींचेही प्रदर्शन या ठिकाणी पहायला मिळत आहे. सेंद्रिय खते, नैसर्गिक खते, वेगवेगळ्या खतांचे मिश्रणे, माती परीक्षण ते कापणीपर्यंतच्या वेगळगवेगळ्या तंत्रज्ञानाची झलक येथे पाहायला मिळते, तरी शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पणनच्या योजनांचा लाभ बाजार समित्यांच्या माध्यमातून मिळत आहे. गावातील विकास सहकारी संस्थांचे बहुउद्देशीय संस्थात रूपांतरण करण्याचा केंद्र शासनाच्या प्रयत्न असून १८ प्रकारचे व्यवसाय या संस्थाना करता येणार आहेत. बाजार आणि शेतकऱ्यांमध्ये दुवा ठरण्याचे काम या संस्था करतील. स्टोरेज, कोल्ड स्टोरेज आदी व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या माल योग्य भावात मोठ्या प्रमाणात माल विकला जाईल असा प्रयत्न असल्याचेही फडणवीस म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती अत्यंत प्रगतिशील असून अत्यंत चांगले काम करते. समितीने पणन विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

ॲड. कोकाटे म्हणाले, वारकरी आणि शेतकरी हे वारीच्या दोन बाजू आहेत. शेतीत येणाऱ्या तंत्रज्ञानाची वारीत सहभागी शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी चांगले प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शेती चांगली आणि सुरळीत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. या प्रदर्शनात सुमारे २५० स्टॉलच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, पीएमएफएमई योजना, आत्मा, स्मार्ट प्रकल्प आदींची माहिती व प्रदर्शन केले आहे. या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत चांगली शेती करतात. केळीची निर्यात मोठी प्रमाणात होते.माशीमुळे डाळिंब आणि इतर फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी बॅगेज, ठिबक, मलचिंग पेपर आदीं योजनांचा फलोत्पादसाठी शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्य आणि केंद्र सरकार मिळून शेतकरी स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आपल्याला एआय मध्ये मोठे काम करायचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने कृषी मध्ये ५००, कोटींची तरतूद केली आहे, असेही ॲड. कोकाटे म्हणाले.

रावल म्हणाले, पंढरपूर बाजार समिती ही उत्कृष्ट बाजार समिती आहे. केळीचे सर्वात मोठे निर्यात हब सोलापूर जिल्हा आहे. मनुके, द्राक्ष, डाळिंबाच्या क्षेत्रात प्रगती करणारा हा जिल्हा आहे. ड्रॅगन फ्रुटचे लागवड करण्याचे धाडस या तालुक्यात झाले आणि ते यशस्वीही करण्यात आले.

लवकरच एडीबीची योजना राज्यात आणण्याचा प्रयत्न होणार आहे. यामध्ये मार्केट कमिटीची बळकटी करण्यासाठी योजना आणण्यासाठी प्रयत्न होणार. त्यात पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रशांत परिचारक यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ही बाजार समिती एक अग्रेसर बाजार समिती आहे. ५५० कोटीच्यावर उलाढाल या बाजार समितीच्या माध्यमातून केली जाते. बेदाण्याचे मोठे मार्केट या बाजार समितीत आहे. चांगल्या प्रकारची शेती या भागातील शेतकरी करतात. मुख्यमंत्री यांनी पंढरपूर हे भविष्यकाळातील एक मोठे तीर्थक्षेत्र होण्यासाठी ध्यास घेतला आहे. प्रशासनाने आषाढी वारीचे अत्यंत चांगले नियोजन केले, असेही ते म्हणाले.

यावेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपसभापती राजू गावडे संचालक मंडळ आदी उपस्थित होते.


### जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ५०३/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे. वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधिश मा.श्रीमती.ए.एस.जाधव सो यांचे समोर**

१)श्री.राजाराम नारायण लगशेट्टी
वय:७४ वर्षे, धंदा: काही नाही
२) श्री.नरसिमलू राजाराम लगशेट्टी
वय:४५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.पांडुरंग राजाराम लगशेट्टी
वय:३८ वर्षे, धंदा: नोकरी
४) श्री.प्रविणकुमार राजाराम लगशेट्टी
वय:३६वर्षे, धंदा:नोकरी
अर्जदार नं.१ ते ४ सर्व राहणार ४४४, क्षीरालिंग नगर, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००५ } अर्जदार
५) पद्मावती राजाराम लगशेट्टी (लग्नापुर्वीचे नाव)
सौ. सोनी श्रीहरी अंकम (लग्नानंतरचे नाव)
वय : ३६ वर्षे, धंदा : घरकाम
रा.१३१,श्रमजिवी नगर,महात्मा गांधी चौक, सोलापूर ४१३००६ }सामनेवाला

**विरुध्द**
कोणी नाही

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेसंबंधी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१ हे मयत लक्ष्मीबाई राजाराम लगशेट्टी यांचे पती असून अर्जदार नं.२ ते ४ हे मुले असून व अर्जदार नं.५ ही विवाहित मुलगी आहे. यातील मयत लक्ष्मीबाई राजाराम लगशेट्टी या दि.१९/१०/२००९ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे नावे डि व सब डि सोलापूर पैकी शहर सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी विडी घरकुल येथील पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ शिवाजीनगर, सोलापूर (म्हाडा), जुळे सोलापूर भाग-२ या योजनेतील अल्प उत्पन्न गटातील ५०.५० चौ.मी. क्षेत्राचा ग्रुप आय-२, मधील भुखंड क्र. ५३ ही खुली जागा मि.व्य/पु.म यांचे मंजूरी आदेश जा.क्र.५४०/०६ हे दि. १७/०६/२००५ पासुन खरेदी तत्वावर कै. लक्ष्मीबाई राजाराम लगशेट्टी यांच्या नावाने मंजूर झालेले आहे. सदर मिळकतीमधील मालकी व कब्जेवहिवाटीच्या हक्कासह

येणेप्रमाणे यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे:पुर्वेस:भुखंडक्र. ५४,पश्चिमेस:भुखंड क्र.५२,दक्षिणेस:रस्ता,उत्तरेस:भुखंड क्र.४६

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत व त्यातील तदंगभूत वस्तुसह. वर नमुद केलेल्या मिळकतीवर म्हाडा कार्यालय येथे व सोलापूर महानगरपालिकेच्या कर विभागास नाव लावणेबाबत अर्जदार नं. १ ते ५ यांनी मयत लक्ष्मीबाई राजाराम लगशेट्टी यांचे मृत्यूपश्चात वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली दि.०६/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि.०६/०७ / २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाने शिक्यानिशी आहे.

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा.अधीक्षक दि.न्या.व.स्तर.सोलापूर**


# ज्ञानोबा...तुकाराम...ज्ञानोबा...तुकाराम जयघोषाने माळीनगर दुमदुमले...!



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील लाखो वारकरी क्षेत्र देहू येथून हरिनाम गात मजल दर मजल करत क्षेत्र पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनाला जाताना पालखी सोहळ्यातील पहिले मानाचे उभे रिंगण माळीनगर ( ता. माळशिरस) येथे भक्तीरसात नाहून जयघोष करीत वाटचाल करतात.हीच प्रथा यंदाही पालखी सोहळ्याने जपत मानाचे दोन अश्व उभे रिंगणात सोडून या अश्वांच्या परिक्रमेने वारकऱ्यांनी अनेक सांप्रदायिक खेळ खेळत पहिले उभे रिंगण आज बुधवारी सकाळी ९ वा.उत्साहात उत्साही, आनंदमय वातावरणात पार पडले.

पांडुरंगा भेटायची आस, आतुरले नयन, विठ्ठल वाणी विठ्ठल, ज्ञानोबा-तुकाराम ज्ञानोबा-तुकाराम असा जयघोष करीत संत तुकाराममहाराज पालखी सोहळा अकलूज येथील मुक्काम आटोपून आज बुधवार दि.२ जून रोजी सकाळी ८.४५ वा.माळीनगर हद्दीत दाखल झाला. माळीनगरच्या वेशीत तुकोबांचा पालखी सोहळा आल्यावर माळीनगर साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे, होलटाईम डायरेक्टर परेश राऊत, जनसंपर्क अधिकारी अनिल बनकर, सरपंच अनुपमा एकतपुरे, उपसरपंच अतुल कांबळे, सदस्य, शुगरकेन सोसायटीच्या वतीने संस्थेचे चेअरमन अमोल ताम्हाणे, व्हा.चेअरमन कपील भोंगळे तसेच महात्मा फुले पतसंस्थेचे व्हा.चेअरमन महादेवराव एकतपुरे, सेक्रेटरी योगेश कचरे, त्याचप्रमाणे सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे व्हा. चेअरमन नितीन इनामके, सेक्रेटरी अजय गिरमे व संचालक, ग्रीनसिटी, सवतगाव, बिजवडी ग्रामपंचायत, विविध संघटना, मंडळे यांनी या पालखी सोहळ्याचे उत्साहात स्वागत केले.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळा स्टार रेसीडेन्सी समोरील या पालखी मार्गाच्या नवीन रस्त्यावर हरिनामाच्या जयघोषात उभ्या रिंगणा ठिकाणी दाखल झाला. रिंगणाचा हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती.टाळकरी, विणेकरी, पताकावाले, पकवाजे व तुळशीवाल्या महिला, आणि बाभूळगावकरांचा व डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या मानाचे अश्व यांनी सुरू असलेल्या हरिनामाच्या गजरात परिक्रमा पूर्ण करीत उभे रिंगण सोहळ्यात लाखो नयनांचे पारणे फेडले.ज्ञानोबा....तुकाराम....

ज्ञानोबा.... तुकाराम या हरी गजराने माळीनगर दुमदुमले. यावेळी अश्वाच्या पाऊलखुनांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची झुंबड उडाली होती.पुन्हा हरिनामाचा गजर करत अश्वांचे उभे रिंगण संपल्यानंतर मॉडेल हायस्कूलच्या प्रांगणात असलेल्या ओपन थिएटरमध्ये विसवण्यासाठी पालखी सोहळा मार्गस्थ झाला.

पालखी सोहळा मैदानावर आल्यानंतर ग्रा.पं.सदस्य विराज निंबाळकर, भारत साठे, दादा गायकवाड व दादा लवटे यांनी पालखी रथातून खांद्यावर घेत ओपन थिएटरमध्ये आणून ठेवली.तेथे पालखीच्या पादुकांची मंत्राच्या जयघोषात विधिवत पूजा कारखान्याचे होलटाईम डायरेक्टर गणेश इनामके व त्यांच्या सुविद्य पत्नी भारतीताई गणेश इनामके या उभयतांच्या हस्ते करण्यात आली.पूजेनंतर आरती होऊन पालखी दर्शनासाठी खुली करण्यात आली.माळीनगर साखर कारखान्याने महिला व पुरुषांसाठी दर्शनाकरिता वेगवेगळ्या रांगेची सोय केल्याने शांततेत सर्वांना व्यवस्थित दर्शन घेता येत होते. यावेळी कारखान्याचे वॉचमन, होमगार्ड, पोलीस यंत्रणा यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

वारकऱ्यांसाठी माळीनगर साखर कारखान्याने सुमारे ५००० वारकऱ्यांची सालाबाद प्रमाणे दुपारच्या मिष्टान्न भोजनाची सोय गुलमोहर इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात केलेली होती. दुपारी बाराच्या सुमारास पालखीने बोरगाव येथील नवीन पालखीतळावरच्या मुक्कामासाठी प्रस्थान ठेवले. माळीनगर सोडल्यानंतर पुढे गट नंबर दोन येथे माढा मतदारसंघाच्या वेशीवर सालाबादप्रमाणे आमदार बबनदादा शिंदे परिवाराने पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी निमित्ताने वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले.फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला. टाळ मृदंगआणि विठू माऊलीच्या गजरात वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले.

प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माऊलींची प्रतिमा देऊन स्वागत केले.

वाखरी येथे जिल्हा प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणीदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.

# 'विठ्ठल नामाची शाळा भरली' वाशिंबेच्या शरदचंद्रजी पवार विद्यालय व जि. प.शाळेत दिंडी सोहळ्याचे आयोजन



**वाशिंबे (सचिन भोईटे):-** शरदचंद्रजी पवार विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने बालदिंडीचे आयोजन मोठ्या उत्साहात केले.या कार्यक्रमात बाल वारकऱ्यांनी रिंगण सोहळ्याचे आयोजन करत विठ्ठल नामाचा गजर केला.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून भक्तीमय वातावरणात गावामध्ये केले होते. या सोहळ्याने विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जाणिवांचा प्रसार झाला. शाळेतील विद्यार्थ्यांनी बाल वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभाग घेत विठ्ठल रुक्मिणीच्या नावाचा जयघोष केला.सकाळी ९ वाजता शाळेच्या प्रंगाणातून दिंडीला सुरुवात झाली. विद्यालयातील ५२२ विद्यार्थ्यांनी टाळ मृदंगाच्या तालावर भक्तीमय वातावरणात गावातील चौकात रिंगण सोहळ्याचे आयोजन केले. छोट्या वारकऱ्यांनी पारंपारागत पोशाखात, डोक्यावर तुळशीचे हार आणि हातात पथका घेऊन विठ्ठल भक्तीचा गजर केला. भक्ती गीते आणि विठ्ठलाच्या जीवनावरील छोटी नाटिका, गीते,अभंग शिवाय विद्यार्थांनी पर्यावरण संरक्षणाचे, समाजहितचे फलक दर्शवत संदेशही दिला.जि.प शाळेतील १८४ विद्यार्थ्यांमध्ये भक्ती आणि संस्कृती बद्दलचा उत्सव वाढलेला पाहायला मिळाला.

पालखी सोहळ्याच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' आणि 'विठ्ठल विठ्ठल 'अशा घोषणा दिल्या. नेहमीप्रमाणे दिंडीच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि अध्यात्मिक मूल्यांचा संदेश यशस्वी विद्यार्थ्यांनी दिला. शाळेमधील दिंडी सोहळयात गावातील युवकांनी आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

यावेळी पालक,महिलांनी विद्याथीर्चा दिंडी सोहळा पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश यादव, जि. प.मुख्याध्यापक श्यामसुंदर शिंदे, व सर्व सहशिक्षक वर्गांनी या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते.


*॥ झाडू संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥*





## पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

**स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा ६.०**

# आषाढी यात्रा २०२५

## यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन

***माझ्या विठ्ठलाची पवित्र पंढरी***
***स्वच्छ, सुंदर, हरित ठेवण्याची माझ्यासह प्रत्येकाची जबाबदारी***

पंढरपूर हे भुवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वाचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

1. यात्रेकरू, दिंडीकरी,फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर ६५ एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.
2. उघड्यावर शौचास बसु नये प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा.
3. शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.
4. पत्रावळी व द्रोणचा वापर :- जेवणाकरीता थमाकील, प्लॉस्टिकच्या पत्रावळी वापरू नये त्याएवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा, द्रोणचा वापर करावा व प्लॉस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.
5. कचरा व्यवस्थापन :- आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकु नये.
6. नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये. नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पाणी प्यावे.
7. शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.
8. धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.
9. पार्कींग व्यवस्था ठिकाणे :- भिमा बस स्टँड मोहोळ रोड, ६५ एकर मागील बाजु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल, अंबाबाई पटांगण, इसबावी विसावा पार्किंग, वेअर हाऊस पार्किंग, यमाई तुकाई पार्किंग, बिडारी बंगला पाकिंग, गजानन महाराज मठ क्र.१. एलआयसी ऑफीस पार्किंग, सुलभ शौचालय पार्किंग, गाडगेबाबा चौक, भक्त निवास, तुळशी वृंदावन शेजारी, ५२ एकर पार्किंग, वाखरी, खादी ग्रामोद्योग, ६५ दिंडी परिसर वाहन, सखुबाई कन्या प्रशाला पार्किंग इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे. वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.

**(श्री. सचिन इथापे)**
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

**(श्री.महेश रोकडे)**
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर

